**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १५७२/२००८**

**१) श्री विजय ज्ञानदेव भगत**
**द्वारा फुलमाळी यांचे घरी, सिध्दार्थ नगर**
**कामठी रोड, टेका नागपूर-१७.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई -३२.**

**३) जन माहिती अधिकारी**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई -३२.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ३.६.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम,१९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे दाखल केलेले नाही. (दुपारी हजर झाले होते.)मात्र, श्री हेमंत तेलंग, लिपिक, जिल्हा पुरवठा कार्यालय, चंद्रपूर यांनी राज्य माहिती आयोगाकडे प्रथम अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी, चंद्रपूर यांना प्राधिकृत केले आहे.परंतु जिल्हा पुरवठा अधिकारी यांना केरोसिनच्या प्रकरणात सुनावणी्स मा. मंत्री, अन्न पुरवठा यांचेकडे हजर राहाणे आवश्यक असल्याने व ते मुंबई येथे

रवाना झाल्यामुळे जिल्हा पुरवठा अधिकारी, चंद्रपूर यांचे वतीने सदर प्रकरणात हजर राहाण्याची परवानगी देण्यास विनंती आहे असा अर्ज सादर केला आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) प्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णया विरुध्द राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावयाचे असते. परंतु सदरच्या प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन दिली नाही तर अधिनियमाचे कलम १९ (१) प्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल करावयाचे असते. व ही सर्व प्रक्रिया ही वैधानिक प्रक्रिया असून संबंधीत नियुक्त झालेले अधिकारी हे प्रक्रिया पुर्ण करण्यास जबाबदार असतात. दुदैवाने मंत्रालयामध्ये असा समज झालेला दिसतो की, विभागीय कार्यालयातील अधिका-यांना प्राधिकृत केल्यास त्यांची जबाबदारी त्यांना टाळता येईल.एकतर हे कायद्याबध्दलचे अज्ञान तरी आहे किंवा मंत्रालयात असल्यामुळे कोणत्याही प्रकारे दुर्लक्ष केले तरी चालते असा एकप्रकारचा समज दिसून येतो. परंतु अधिनियमाच्या कलम १९ (६) प्रमाणे अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी ही ज्या जन माहिती अधिका-यास माहिती मागितली असेल त्या जन माहिती अधिका-याची असते. व अधिनियमाच्या कलम २० प्रमाणे संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यास ते शास्तीस पात्र असतात. व त्यांच्या विरुध्द जी शास्ती लादली जाते ती त्यांच्या वैयक्तिक वेतनातून वसुल करण्यात येते याबाबतची जाणिव वरील जन माहिती अधिकारी यांना दिसत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय हा न्यायिकवत पध्दतीने द्यायचा असल्यामुळे ती त्यांची वैधानिक जबाबदारी आहे. व त्याबाबतही स्वत:ची जबाबदारी ही कोणत्याही प्रकारे प्राधिकृत करुन दूस-या अधिका-यांवर टाकता येत नाही. व हया बाबतही प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे झालेल्या सुनावणीचे किंवा निर्णयाची कागदपत्रे ही आयोगाकडे सादर करणे आवश्यक असते. सदरच्या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांची वैधानिक जबाबदारी टाळलेली दिसून येते. व हा एकप्रकारे आयोगाचा सुध्दा अवमान आहे व याबाबतची नोंद जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी घेतील अशी अपेक्षा आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१२.२००६ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, कॅम्प कार्यालय, नागपूर (हिवाळी अधिवेशन) अशा प्रकारे दिलेला असून माहितीचा विषय दिनांक १९.७.२००६ रोजी " आपण सादर केलेल्या अर्जावर कार्यवाही संबंधी सविस्तर माहिती. (अर्जाची प्रत सोबत जोडली आहे). सदरची माहिती टपालाद्वारे घेणार" असे नमूद केले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक १६.३.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी, मंत्रालय, मुंबई अन्न पुरवठा विभाग, प्रधान सचिव यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेली दिसते. सदरच्या प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय देण्यात आलेला दिसून येत नाही. यावरुन जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतूदींचे उल्लंघन केलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती म्हणजे ३० दिवसांमध्ये सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ते दोषी आढळून येतात. वर नमूद केल्याप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा कोणत्याही प्रकारे प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे अधिनियमाच्या तरतूदीचे उल्लंघन केलेले दिसून येते.

आज सुनावणीच्या वेळेस उपस्थित असलेल्या लिपिक यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे असे सांगितले. यावरुन अन्न पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग या विभागातील कोणत्याही अधिका-यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदींचे कोणत्याही प्रकारे माहिती दिसून येत नाही. व आज जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे ती किती विलंबाने उपलब्ध करुन दिली आहे याची सुध्दा त्यांना जाणिव दिसत नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी वर नमूद केल्याप्रमाणे पुर्णतः दोषी आढळून येतात व शास्तीस पात्र आहे. मात्र, अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्ती लादावयाची असल्यास परंतुकाप्रमाणे त्यांचे म्हणणे ऐकुण घेणे हे आवश्यक आहे. परंतु, जन माहित अधिकारी हे आज हजर नसल्यामुळे त्यांचे म्हणणे एकुण घेता येत नसल्यामुळे त्यांचे

विरुध्द अधिनियमाचे कलम २० (२) प्रमाणे विभागीय चौकशीची शिफारस करणे हे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ८.१२.२००६ च्या अर्जाप्रमाणे माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक ८.१२.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने कलम ७ (१) प्रमाणे ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे अधिनियमाचे कलम २० प्रमाणे ते दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांच्या विरुध्द पोटकलम (२) प्रमाणे विभागीय चौकशीची शिफारस करण्यात येत आहे. सदरची विभागीय चौकशी ही प्रधान सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांनी करुन ३ महिन्यांत आयोगाकडे अहवाल सादर करावा.

३) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा त्यांची वैधानिक जबाबदारी टाळलेली दिसून येत असल्यामुळे अधिनियमाच्या तरतूदींचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांना ताकिद देण्यात येत आहे.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत प्रधान सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पोस्टाने पाठविण्यात यावी.

५) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक ३.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**